ePaper 'लव्ह जिहाद' कायद्याला विरोध – केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले

वर्ष - 8 I अंक - 212 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 16 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- आपण क्रिकेटपटू आहोत अभिनेते नाही!
- आयसीसीने चाहत्यांना दिलं मोठं गिफ्ट
- महाकुंभमेळ्यात पुन्हा अग्नितांडव!
- केजरीवालांना आणखी एक धक्का


## राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

# शिंदे-फडणवीस यांच्यात कोल्ड वॉर?

### अजित पवार यांनी व्यक्त केली रोखठोक प्रतिक्रिया

I पुणे I महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक घडामोडी सुरु आहेत. या घडामोडींचा नेमका अर्थ काय काढायचा? हे आगामी काळात स्पष्ट होईलच. पण सध्या सुरु असलेल्या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतंच एका कार्यक्रमात मला हलक्यात घेऊ नका, असं वक्तव्य केलं. त्यांचं हे वक्तव्य मित्रपक्षाच्या नेत्यांनाच इशारा असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.**



यामागे कारणही तसं आहे. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराज असल्याची चर्चा सातत्याने सुरु आहे. शिंदेंनी काही बैठकांना अनुपस्थिती लावल्याने या चर्चांना जास्त बळ आलं. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाच आज पत्रकारांनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात कोल्ड वॉर सुरु आहे का? असा प्रश्न विचारला. त्यावर अजित पवारांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली.

"शिंदे आणि फडणवीस यांच्यात कोल्ड वॉर सुरु आहे, हे धादांत खोटं आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस दोन्ही नेत्यांनी यावर स्पष्टीकरण दिलेलं आहे. तुम्हाला कोणत्या बातम्या मिळाल्या नाहीत की कोल्ड वॉर असं रुप देतात. असं काही नाही. आमचं सगळं चांगलं आहे. जनतेने आम्हाला भरपूर पाठिंबा दिलेला आहे", असं अजित पवार म्हणाले.

"आमचं 3 तारखेला अधिवेशन आहे. त्यावेळी आम्ही शेवटच्या पुरवण्या मागण्यांवर चर्चा करु. त्या मंजूर करुन घेऊ. विनोयजन बिल मंजूर करुन घेऊ. त्यानंतर आपल्या राज्याचा अतिशय चांगला अर्थसंकल्प, राज्याला विकासाच्या दिशेला नेणारा अर्थसंकल्प मांडू", असं अजित पवार म्हणाले.

एकनाथ शिंदे यांनी मला हलक्यात घेऊ नका असा इशारा दिला आहे. हा इशारा कुणाला दिला आहे? असा प्रश्न पत्रकारांनी अजित पवारांना विचारलं असता, "उबाठाच्या प्रमुखांना इशारा आहे", असं उत्तर अजित पवारांनी दिलं.

### केंद्रीय अर्थसंकल्पातून राज्याला मोठी मदत

"आम्ही राज्याच्या भल्याच्या दृष्टीने पावलं उचलत आहोत. अर्थसंकल्पात केंद्राने राज्याला काय दिलं आहे याचं प्रेजन्टेशन झालेलं आहे. यंदा केंद्राने सव्वा ते दीड लाख कोटी रुपये 50 वर्षाच्या रिपेमेंटवर बिनव्याजी वेगवेगळ्या राज्यांनी घेऊन जा असं सांगितलं आहे. त्यात जास्तीत जास्त निधी आणायचा हा सरकारचा प्रयत्न आहे", अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.

## नियमबाह्य बांधकामांवरील कारवाई थांबणार नाही

### मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय: कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, भंगार दुकानांना "अभय" नाहीच!

I पिंपरी-चिंचवड I महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील चिखली-कुदळवाडी येथे शहराच्या इतिहासातील सर्वात मोठी अतिक्रमण कारवाई सुरू आहे. बेकायदा भंगार दुकानदार आणि अनधिकृत बांधकाम मालमत्ताधारकांनी कारवाईला स्थगिती देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिका न्यायालयाने फेटाळली असून, नियमबाह्य बांधकामांवरील कारवाई थांबवता येणार नाही, असे म्हटले आहे.**



कुडळवाडीतील अनधिकृत स्क्रॅप डीलर्स आणि अवैध गोदामे आणि औद्योगिक युनिट्सचे मालक यांच्याकडून दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली. या याचिकेतील लोकांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) द्वारा सुरू केलेल्या अतिक्रम कारवाईला आव्हान दिले होते. महापालिका प्रशासनाने आतापर्यंत कुदळवाडी आणि चिखली भागात गेल्या सात दिवसांत ७९१ एकर क्षेत्रफळावर ४ हजार ३१ अनधिकृत स्ट्रक्चरवर कारवाई केली आहे. ज्यामध्ये औद्योगिक युनिट्स, स्क्रॅप गोदामे आणि टिन शेड्स समाविष्ट आहेत. या बांधकामांना बांधकाम परवानगी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची एनओसी नाही. तसेच मालकांनी कामगार कायद्यानुसार आणि आगीच्या सुरक्षा उपायांनुसार नियमांचे उल्लंघन केले आहे, असे म्हणणे पिंपरी-चिंचवड महापालिक प्रशासनाने न्यायालयात मांडले. तसेच, ४ हजार ३०० हून अधिक अनधिकृत बांधकाम, पत्राशेड धारकांना नोटिसा बजावल्या आहेत. मात्र, दिलेल्या मुदतीमध्ये संबंधितांनी अतिक्रमण काढून घेतलेले नाही, असा दावाही प्रशासनाने केला आहे. बुधवारच्या पत्रकार परिषदेत लघु उद्योगांच्या मालकांनी सांगितले की, त्यांच्या उद्योगांना ७,६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. सर्व नोटिसा दिलेल्या मालमत्ताधारकांवर अतिक्रमण कारवाई झाल्यास नुकसान १,५०० कोटी रुपयांनी वाढेल. मात्र, न्यायालयाने या संबंधातील याचिका फेटाळून लावली असून, महापालिका प्रशासनाच्या कारवाईला पाठबळ मिळाले आहे.

### बेकायदेशीर बांधकामांबाबत याचिका स्वीकारणार नाही...

यापूर्वी दि. ४ फेब्रुवारी रोजी, उच्च न्यायालयाने आणखी एक गटाच्या मालकांची याचिका फेटाळली होती. "आम्ही भारतीय संविधानाच्या कलम २२६ अंतर्गत याचिका स्वीकारण्यास तयार नाही कारण या रचनांमध्ये पूर्णपणे बेकायदेशीर आणि अनधिकृत आहेत," असे न्यायमूर्ती कमल खाता आणि ए.एस. गडकरी यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांचे ६०० अधिकारी आणि महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० कर्मचारी या अतिक्रमण कारवाई मोहिमेसाठी तैनात करण्यात आले आहेत.

# अन्यथा शहराचे पाणी बंद केले जाईल!

## 726 कोटी 12 लाख रुपयांची थकबाकी तातडीने भरावी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जलसंपदा विभागाकडून पाणी घेणाऱ्या पुणे महापालिकेने जलसंपदा विभागाची ७२६ कोटी १२ लाख रुपयांची थकबाकी तातडीने भरावी अन्यथा शहराचे पाणी बंद केले जाईल, असा इशारा जलसंपदा विभागाने दिल्याने महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात वाद निर्माण झाला आहे.**



मात्र, पाणीपट्टीची थकबाकी १६० कोटी रुपये असून, नियमितपणे पाणीपट्टी भरण्यात येत असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.जलसंपदा विभागाने आकारलेल्या पाणीपट्टीविरोधात महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाकडे याचिका दाखल असल्याचे स्पष्टीकरण महापालिकेने दिले आहेपुणे महापालिकेला जलसंपदा विभागाच्या वतीने खडकवासला, भामा आसखेड या धरणातून पाणी दिले जाते. शहराची वाढलेली हद्द व वाढणारी लोकसंख्या यामुळे महापालिकेला मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी धरणातून घ्यावे लागत आहे.त्यामुळे महापालिका अतिरिक्त पाणीपट्टीदेखील भरत आहे. मात्र, गेल्या तीन-चार वर्षांपासून पुणे महापालिका आणि जलसंपदा विभागामध्ये पाणीपट्टीच्या आकारणीवरून जोरदार वाद निर्माण झालेला आहे.महापालिका नागरिकांना पाणी देत असतानाही ठरवून दिलेल्या क्षमतेपेक्षा अधिक पाणी वापरल्याने जलसंपदा विभाग औद्योगिक दराने पाण्याचे बिल महापालिकेला देत आहे. त्यामुळे महापालिकेला दीडशे ते दोनशे कोटी रुपये येणारे बिल सातशे कोटींच्या घरात गेले आहे. शहरात एकही प्रक्रिया उद्योग नसताना जलसंपदा विभागाने त्याची पाणीपट्टी वसूल करण्यासाठी महापालिकेला बिल दिले आहे. तसेच व्यावसायिक वापर १५ टक्के दाखवला आहे. सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडले जात असल्याने लावण्यात आलेला दंड यासह अन्य कारणांनी जलसंपदा विभागाने महापालिकेला पाणीपट्टी पाठवली आहे. त्याची थकबाकी ७२६ कोटी रुपयांवर पोचली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही संस्थांमध्ये बैठका झाल्या, पण निर्णय झालेला नाही. त्यामुळे महापालिकेने लवादात याचिका दाखल केली आहे.पुणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप म्हणाले, पाणी वापराबाबत जलसंपदा विभागाने आकारलेल्या पाणीपट्टीबाबत महापालिकेची हरकत आहे. त्यावर महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाकडे याचिका दाखल केली आहे. नियमित पाणीपट्टी १६० कोटी रुपये असून, ही रक्कम महापालिकेतर्फे भरली जाईल. खडकवासला पाटबंधारे विभागाच्या अधिक्षक श्वेता कुऱ्हाडे म्हणाल्या, महापालिकेकडे थकबाकी आहे. त्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. अद्यापही ती देण्यात आली नाही. त्यामुळे महापालिकेला नोटीस बजावण्यात आली आहे. थकबाकी न भरल्यास २५ फेब्रुवारीपासून पाणीकपात केली जाईल.मात्र, पाणीपट्टीची थकबाकी १६० कोटी रुपये असून, नियमितपणे पाणीपट्टी भरण्यात येत असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

### पाणीपट्टीची थकबाकी 160 कोटी

पाणीपट्टीची थकबाकी १६० कोटी रुपये असून, नियमितपणे पाणीपट्टी भरण्यात येत असल्याचा दावा महापालिकेने केला आहे. जलसंपदा विभागाने आकारलेल्या पाणीपट्टीविरोधात महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाकडे याचिका दाखल असल्याचे स्पष्टीकरण महापालिकेने दिले आहेपुणे महापालिकेला जलसंपदा विभागाच्या वतीने खडकवासला, भामा आसखेड या धरणातून पाणी दिले जाते. शहराची वाढलेली हद्द व वाढणारी लोकसंख्या यामुळे महापालिकेला मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी धरणातून घ्यावे लागत आहे. त्यामुळे महापालिका अतिरिक्त पाणीपट्टीदेखील भरत आहे. मात्र, गेल्या तीन-चार वर्षांपासून पुणे महापालिका आणि जलसंपदा विभागामध्ये पाणीपट्टीच्या आकारणीवरून जोरदार वाद निर्माण झालेला आहे. त्यामुळे महापालिकेला दीडशे ते दोनशे कोटी रुपये येणारे बिल सातशे कोटींच्या घरात गेले आहे. शहरात एकही प्रक्रिया उद्योग नसताना जलसंपदा विभागाने त्याची पाणीपट्टी वसूल करण्यासाठी महापालिकेला बिल दिले आहे.

# बंजारा समाज भवनासाठी ५१ लाखाच्या निधीची घोषणा

## आमदार सुनील शेळके: तळेगावमध्ये संत सेवालाल जयंती उत्साहात साजरी

। तळेगाव दाभाडे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ तालुक्यात बंजारा समाज भवन बांधण्यासाठी आपण प्रयत्नशील असून, बंजारा बांधवानी मावळ तालुक्यात जागा उपलब्ध करून द्यावी. आपण समाज भवन बांधण्यासाठी ५१ लाख रुपयांचा निधी देऊ, असे आश्वासन मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिले.**





बंजारा सेवा संघ, मावळच्या वतीने संत गुरु सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त तळेगाव दाभाडे येथील सुशीला मंगल कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी, जिजामाता चौक, मारुती मंदिर चौक ते सुशीला मंगल कार्यालया दरम्यान भव्य रथयात्रा काढण्यात आली. या रथयात्रेत मावळ तालुक्यातील बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. त्यानंतर संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व भोग करण्यात आला. या मेळाव्याचे उदघाटन उद्योजक संतोष पवार यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुनील शेळके होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, श्रीमंत सत्येंद्रराजे दाभाडे, याज्ञसेनीराजे दाभाडे, तळेगाव नगरपरिषदेच्या उपमुख्याधिकारी ममता चव्हाण – राठोड, तळेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक घोगरे, युवानेते रवींद्र भेगडे, बंजारा सेवा संघ मावळचे संस्थापक अध्यक्ष हिरा रतन जाधव, अध्यक्ष महादेव राठोड, उपाध्यक्ष चंदू राठोड, देसू राठोड, सचिव अमरजीत चव्हाण, खजिनदार राजू पवार, अभिनेते आशुतोष राठोड, मार्ग फाऊंडेशन सोलापूरचे अध्यक्ष संतोष पवार, शंकर पवार, जयराम चव्हाण, विजापूरचे माजी स्थायी समिती अध्यक्ष रामभाऊ राठोड, देवेंद्र राठोड, विठ्ठल राठोड, शेट्टीप्रताप चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक हिरा जाधव यांनी केले. सूत्रसंचालन नितीन पांडे यांनी केले, तर लखन जाधव यांनी आभार मानले.

### अनेकजण उच्चशिक्षित

आमदार शेळके म्हणाले, की बंजारा समाज हा मेहनत करून जीवन जगणारा समाज आहे. आज शिक्षण घेऊन हा समाज मुख्य प्रवाहात आला आहे. अनेकजण उच्चशिक्षित असून, मोठ्या अधिकारीपदावर कार्यरत आहेत. या समाजाला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. ममता राठोड यांनी बंजारा समाजाचे योगदान लक्षात घेऊन या समाजाला हक्काचे व्यासपीठ समाजभवन मिळावे,अशी मागणी समाजाच्या वतीने केली. खासदार श्रीरंग बारणे, सत्येंद्रराजे दाभाडे, रवींद्र भेगडे, संतोष पवार यांनीही विचार व्यक्त केले.

# कुदळवाडीतील भंगार व्यावसायिकांना

# सभोवतालच्या गावांत ‘नो एन्ट्री’!

## ग्रामपंचायतींचे ठराव : भंगार व्यावसायिकांसमोर पुनर्वसनाचे मोठे आव्हान

। पिंपरी-चिंचवड।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली-कुदळवाडीमध्ये महानगरपालिका प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईमध्ये विस्थापित झालेल्या भंगार व्यापाऱ्यांनी आता महापालिका हद्दीलगत असलेल्या गावांकडे धाव घेतली. मात्र, सभोवतालच्या ग्रांमपंचायतींनी भंगार व्यावसायिकांना जागा न देण्याबाबत ठराव केले आहेत. त्यामुळे व्यावसायिकांसमोर व्यवसाय पुनर्वसनाचे आव्हान आहे.**




शहरातील वाहतूक व्यवस्थापन, इंद्रायणी नदी प्रदूषण, विकास आराखड्यातील रस्ते आणि आरक्षणांमध्ये अतिक्रमण केलेल्या मालमत्ता धारकांना सुरूवातीला महापालिका प्रशासनाने अतिक्रमण काढून घेण्याबाबत नोटीसा बजावल्या होत्या. अतिक्रमण कारवाई सुरू झाल्यानंतर त्याला स्थानिक व्यापाऱ्यांनी रस्त्यावर उतरुन विरोध केला. त्यानंतर न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या होत्या. मात्र, न्यायालयाने कायदा-सुव्यवस्था निर्माण होणार असेल, तर अशा अनधिकृत बांधकामांवर सरसकट कारवाई करा, असे निर्देश दिले.

त्यामुळे महापालिका प्रशासनाने सरसकट कारवाई तीव्र केली. परिणामी, गेल्या 7 दिवसांमध्ये 800 एकरहून अधिक बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. त्यामुळे संबंधित भंगार दुकानदारांनी लगतच्या गावांमध्ये जागा शोधण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

दरम्यान, ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड प्रशासनाने ग्रामस्थांसाठी जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, “समस्थ ग्रामस्थ पिंपळगाव तर्फे खेड यांना कळवणेत येते की, चिखली-मोशी येथील भंगार (स्क्रॅप) दुकाने यांना आपल्या परिसरात कोणीही जागा विकत किंवा भाड्याने देवू नये. जेणेकरुन भविष्यात आपल्याला त्रास होईल. अशा त्रासदायक व्यावसायास ग्रामपंचायत कोणत्याही प्रकारची परवागनी देणार नाही.” याचधर्तीवर कुरूळी, केळगाव, मरकळ आदी विविध ग्रामपंचायतींनी ठराव केले आहेत.

### कुदळवाडीसारखी परिस्थिती गावात नको..

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने शहरात अतिक्रमण कारवाई सुरू केली आहे. चिखली-कुदळवाडी येथे अनधिकृत भंगार दुकाने, गोदामे आणि बेकायदा इंडस्ट्रीज हटवण्यात आल्या आहेत. त्यामुळे या व्यावसायिकांनी आता महापालिका हद्दीलगत असलेल्या गावांमध्ये व्यवसाय सुरू करण्यासाठी जागा शोधत आहेत. वास्तविक, गेल्या 25-30 वर्षांपासून चिखली-कुदळवाडीमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय केला जात होता. त्यामुळे हवा, पाणी आणि ध्वनी प्रदूषण, वाढती गुन्हेगारी यासह अवैध व्यवसाय वाढले होते. परिणामी, पिंपरी-चिंचवडसह आसपासच्या परिसराच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. वाहतूक कोंडी आणि आपतकालीन परिस्थितीमध्ये होणारी असुविधा यामुळे परिसरातील सोसायटीधारक मोठ्या प्रमाणात त्रस्त होते. असा मन:स्ताप आपल्या गावात होवू नये, अशी भूमिका विविध गावांतील ग्रामस्थांकडून बोलून दाखवली जात आहे.

# प्रदूषण करणाऱ्यांवर आता २४ तास “करडी नजर”

## पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेद्वारे दोन खाजगी संस्थेची नेमणूक: आयुक्त शेखर सिंह

।पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहराच्या सौदर्य व नागरिकांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी सदैव तत्पर असते. त्यासाठी महापालिका वेगवेगळे उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून आता शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा, राडा-रोडा, प्लास्टिक, शहरात आरएमसी प्लॅटमधून होणारे हवेचे प्रदूषण, बांधकामाच्या ठिकाणी होणारा कर्कश आवाज, शहरात होणारे ध्वनी प्रदूषण, घर बांधकाम करतांना घराच्या बाहेर टाकला जाणारा राडारोडा तसेच सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर महापालिका २४X७ करडी नजर ठेवणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेने मे शुभम उद्योग प्रा. लि. व मे. सैनिक इंटलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा. लि. या संस्थेची स्वतंत्रपणे नेमणूक केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात पर्यावरणाची हानी करणाऱ्या कंपन्या किंवा समाजकंटकांवर महापालिका या संस्थेमार्फत लक्ष ठेवणार असून पर्यावरणाची हानी करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.**




पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिका हद्दीमध्ये स्थानिक नागरिक किंवा अज्ञात नागरिक रस्त्यांच्या कडेला नदी नाले यांच्या कडेला अनधिकृत भराव व बांधकाम राडा-रोडा टाकतात. सार्वजनिक ठिकाणी घनकचरा टाकणे परिसर अस्वच्छ ठेवणे, रस्ते पदपथावर घाण-कचरा करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, लघुशंका करणे, सार्वजनिक सभा संपल्यानंतर साफसफाई न करणे, जीव वैद्यकीय घनकचरा सार्वजनिक ठिकाणी फेकणे, कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा उपयोग करणे, मोकळ्या जागेवर अस्वच्छता ठेवणे, डास उत्पन्न करणाऱ्या जागा निर्माण करणे, तसेच लहान उद्योजक कारखानदार सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नाल्यात किंवा नदी पात्रात सोडतात. या सर्व कारणांमुळे महानगरपालिका परिसरात अस्वच्छता पसरते. परिणामी पर्यवरण हानी होते. नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या पुढाकारतून पर्यावरण हानी रोखण्यासाठी मे. शुभम उद्योग प्रा. लि. व मे. सैनिक इंटलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा.लि. या संस्थेची नेमणूक केली आहे.

सदर संस्थेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील बांधकाम व्यवस्थापन २०१६, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम २०१६, बांधकाम राडा रोडा मार्गदर्शन तत्वे, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन मार्गदर्शन तत्वे, ई- कचरा व्यवस्थापन नियम २०२२, प्लास्टिक व्यवस्थापन नियम २०२२ इत्यादी नियम व अधिनियमानुसार वरील दोन्ही पथकांमार्फत २४x७ कारवाई करण्यात येणार आहे.

### नियमांचे उल्लघन केल्यास दंडात्मक कारवाई


पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिका हद्दीतील नागरिक, कारखानदार, दुकानदार, तसेच सर्व प्रकारच्या व्यावसायिकांना सूचित करण्यात येते की पिंपरी चिंचवड शहरात कोणत्याही प्रकारे पर्यावरणास हानिकारक कृती करत असाल तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार सदर नागरिक, कारखानदार, बिल्डर यांच्यावर कारवाई करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई देखील करण्यात येणार आहे.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# “बुडत्या जहाजाला कॅप्टन अडगळीतून थेट चिखलात !



**अखेरची घरघर लागलेल्या आणि शेवटच्या घटका मोजत असलेल्या काँग्रेस पक्षाला शेवटी महाराष्ट्रात अध्यक्ष मिळाला आहे. गेली कित्येक दिवस या प्रश्नाचे घोंगडे भिजत पडले होते. नाना पटोले यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन सुद्धा तो स्वीकारला गेला नव्हता. पण, या बुडत्या जहाजाचा कॅप्टन होणार कोण ? या चर्चेत अडकलेल्या राजकारणाने अखेर कॅप्टन मिळाल्यामुळे सुटकेचा विश्वास टाकला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद माजी आमदार आणि बुलढाण्याचे बंटी ऊर्फ हर्षवर्धन सपकाळ यांच्या गळ्यात टाकण्यात काँग्रेसला यश आले आहे ! एका वाक्यात सांगायचे झाले, तर एखाद्या बुडत्या बँकेचे अध्यक्षपद सपकाळ यांनी स्वीकारल्याची चर्चा आहे.**

## जुनीच दारू, नवीन बाटली !

अध्यक्षपद पाहिजे का हो अध्यक्षपद, असा बाजार काँग्रेसच्या नेत्यांनी मांडला होता, पण, अध्यक्षपद स्वीकारण्यासच काय तोंड दाखवण्यासही नेते तयार नव्हते. ज्याला विचारावे, तो नकार देतो, सारेच उगवत्या सूर्याला नमस्कार करणारे काँग्रेसचे नेते, डुबत्या जहाजाचा कॅप्टन व्हायला एकही जण तयार होत नव्हता. शेवटी जबरदस्तीने का होईना, बुलढाण्याचे माजी आमदार बंटी ऊर्फ हर्षवर्धन सपकाळ यांच्या गळ्यात एकदाची काँग्रेसने प्रदेशाध्यक्षपदाची माळ टाकली, आणि काँग्रेसच नव्हे तर सगळ्यांनीच नि:श्वास टाकला. जुन्याच बाटलीत नवीन दारू भरावी, तसा हा प्रकार झाला आहे!

## चाचपणी युवा नेतृत्वाची अन् म्हाताऱ्यांचीही

वास्तविक पाहता, यासाठी एक अतिशय चपखल उदाहरण देता येईल. वयाने आणि शरीराने थोराड असलेल्या सरपंचाच्या पोरीला जर नवरा मिळत नसेल,तर सरपंच त्याच्याकडे रोजंदारीवर काम करणाऱ्या घरगड्याला घरजावई करून घेतो. अगदीच कुमारिका म्हणून काय जगायचे, त्यापेक्षा एखाद्याच्या गळ्यात हार आणि हात टाकून मोकळे व्हायचे, तसे प्रदेश काँग्रेसचे झाले होते. कारण ज्याला विचारावे, तो पळ काढायचा.. नकार द्यायचा.. तोंड लपवत फिरायचा.. मग,विश्वजित कदमांसारख्या युवा नेतृत्वापासून ते धडाकेबाज सतेज ऊर्फ बंटी पाटील, विजय वडेट्टीवार यांच्यापर्यंत किंवा जख्खड म्हातारे झालेले नेतृत्व म्हणजे बाळासाहेब थोरात किंवा पृथ्वीराज चव्हाण यांच्यापर्यंत अनेकांना आग्रहाने विचारण्यात आले. अगदी काठी टेकत टेकत चालणाऱ्या पुण्याच्या उल्हास पवारांकडे देखील काँग्रेसने आशाळभूत नजर टाकायला कमी केली नाही. शेवटी एकदाचा बंटी सपकाळांनी होकार दिला, बुडणाऱ्या झाडाला कॅप्टन मिळाल्याचा मोठा आनंद झाला!

## नवरे बदलून उपयोग काय?

एका नटीने लग्न केले..तिला नवऱ्यापासून मूलबाळ झाले नाही..तो दररोज पाठ करून पुढच्या क्षणी तो डाराडूर झोपायचा..म्हणून तिने घटस्फोट देऊन दुसरा निवडला, लग्न केले! पण, त्यानेही त्याकाळी शंभर रुपयांसाठी नसबंदी करून घेतली होती, असे नवे नाटक पुढे आले. बाप रे, ती पुन्हा संकटात सापडली. तसे या काँग्रेसचे झाले आहे..म्हणजे, नवख्या बंटी सपकाळांपेक्षा अनुभवी आणि सतत चर्चेत राहणारे नाना पटोले यांच्यामध्ये काय कमी होती ? वाईट याचे वाटते, की या दिवसात काँग्रेसची थेट हेलन किंवा रेखा झाली आहे..जवानीत तिच्यासाठी उड्या आणि आता उरले सुरले नेतेही तिला स्वीकारायला तयार नाहीत..!

## कोण आहेत हे बंटी सपकाळ ?

बुलढाणा जिल्ह्यातही फारसे चर्चिले गेलेले बंटी सपकाळ हे नाव नक्कीच नाही. त्या जिल्ह्यातील नेत्यांमध्ये विविधता क्वचितच आढळते, हर्षवर्धन सपकाळ त्याला काहीसे अपवाद आहेत, सामाजिक कार्य असो अथवा सांस्कृतिक चळवळ किंवा शेती तसेच राजकारण.. अगदी वेगळ्या ढंगाच्या बांधलेल्या बंगल्यापासून ते सातत्याने पस्तीस वर्षे थोर समाजसेवक वंदनीय बाबा आमटे यांच्या कार्यकर्त्यांबरोबर आदिवासी भागात न थकता, न थांबता सामाजिक कार्यात झोकून देणारा हा नेता बुलढाण्यासारख्या दुर्लक्षित जिल्ह्यात राहूनही आपले वेगळेपण जपतो..वेगळ्या ढंगाने, मिळविलेल्या पैशांचा विनियोग करतो! वयाने सर्वाधिक लहान असणारा हा एकेकाळचा जिल्हा परिषद अध्यक्ष, खिसे मोकळे करून चालणाऱ्या प्रदेश काँग्रेसचा खर्च किंवा कार्यालयीन पगार देखील कोठून आणायचा, हीच नेत्यांना भेडसावणारी चिंता, नानाभाऊ याच्या त्याच्या खिशात हात टाकून कसातरी खर्च भागवायचे, हे तर संपूर्ण जगाला माहित आहे.

## शिवधनुष्य पेलणार का?

एकीकडे काँग्रेस जेरीस आलेली.. कोणत्याच निवडणुकीत विजय दृष्टीपथात सुद्धा न येणारी..त्यात सध्याच्या अति बलाढ्य 'महायुती' समोर टिकाव धरायचा आहे आणि तो देखील साधी आमदारकीही नसताना.. म्हणजे एखाद्या कृष पैलवानाला कुस्ती खेळण्यासाठी महाराष्ट्र केसरी मिळवलेल्या पैलवानाच्या अंगावर सोडण्यासारखे ! एकेकाळी प्रदेशाध्यक्ष होण्यासाठी काँग्रेसमध्ये मोठी चुरस असायची, आज काय ती अवस्था? जो तो तोंड लपवून नकार देतो आहे..शेवटी जरी जबरदस्तीने सपकाळांच्या तोंडात साखर कोंबली गेली असली तरी ती त्यांना कडू नक्कीच लागणार नाही.. यालाच खेड्यामध्ये जबरदस्तीचा रामराम म्हणतात, बरं का! थोडक्यात सांगायचे तर काँग्रेसची बुडत चाललेली नौका आधी समुद्राच्या लाटांमधून वाचवायची आहे आणि मग 'वल्हव रे नाखवा' म्हणत तिला किनाऱ्यावर लावायचे आहे.. सध्या काँग्रेसकडे नाही विकासाच्या दृष्टिकोन, जनतेचे पाठबळ, आर्थिक सुबत्ता, योग्य अशी ध्येय धोरणे, त्यात पक्षाला विजयी कसे करणार ?, हा खरा आता सपकाळांपुढचा महत्त्वाचा प्रश्न आहे, सध्या मात्र त्यांना खूप साऱ्या शुभेच्छा!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरेंनी आत्मचिंतन करण्याची गरज!

## शिव्या देणाऱ्यांना कामातून उत्तर द्यायचे : एकनाथ शिंदे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिवसेना ठाकरे गटातून लोक बाहेर पडत आहे, त्याचे उद्धव ठाकरेंनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. शिवसेना ठाकरे गटात कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्याचे काम केले गेले. मात्र बाळासाहेबांच्या या शिवसेनेत काम करणारा कार्यकर्ता राजा असणार आहे. आम्हाला शिव्या शाप देणाऱ्यांना कामातून उत्तर द्यायचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. रत्नागिरी येथे घेण्यात आलेल्या महायुतीच्या आभार सभे प्रसंगी ते बोलत होते.**




कोकणचा विकास करण्यासाठी कोकण विकास प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आली आहे. कोयनेतून वाहून जाणारे ६७ टीएमसी पाणी थांबवण्याचे काम सरकारकडून करण्यात येत असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले, महायुतीचा विजय हा बाळासाहेबांच्या चरणी अर्पण आहे. कोकणाने बाळासाहेबांवर आणि धनुष्यबाणावर प्रेम केले आहे. शिवसेना वाढीमध्ये कोकणाचा सिंहाचा वाटा आहे. नुकत्याच झालेल्या निवडणूकमध्ये महाविकास आघाडीपेक्षा आपला स्ट्राइक रेट जास्त आहे. शिवसेनेचा एकही आमदार निवडून येणार नाही, असे भाकीत करणाऱ्यांची तोंडे बंद झाली आहेत. ८० पैकी ६० जागा शिवसेनेने निवडून आणले आहेत. महायुतीचे २३२ आमदार निवडून आले आहेत. महायुतीला पंधरा लाख मते जास्तीची मिळाली आहे. लाडक्या बहिणीनी महायुतीला मत दिल्याने शिवसेनेने अभूतपूर्व यश मिळवले असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.ते म्हणाले, महाविकास आघाडीने बंद पडले सर्व उद्योग प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र विकासाला चालना देण्यात आली आहे. मी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र एक नंबर ला आणून ठेवला आहे. पदे येतात आणि जातात, सत्ता येथे जाते मात्र एकदा नाव गेले की परत येत नाही असे शिंदे यांनी सांगितले. दावोसला जाऊन जाऊन १६ लाख कोटीचा उद्योग करार करण्यात आला आहे. यामुळे रोजगार उत्पन्न होणार आहे. कोण रामदास कदम?कोण एकनाथ शिंदे? असे म्हणणाऱ्यांना आम्ही कोण आहोत हे दाखवून दिले आहे. आमच्या नादी लागू नका असा इशाराही शिंदे यांनी दिला. जोपर्यंत आमच्या मागे लाडक्या बहिणी, भाऊ आणि लाडके शेतकरी आहेत, तोपर्यंत आम्हाला कोणाचीही भीती नसल्याचे यांनी सांगितले.यावेळी दापोलीचे आमदार योगेश कदम यांनी कोकणात आणखी शिवसेना वाढवणार असे आश्वासन शिंदे यांना दिले. माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, बाळासाहेबांच्या विचाराला कालिमा फासण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले आहे. मुख्यमंत्री पद घेऊन बाळासाहेबांनी कमावलेल सगळं गमावलं आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे झाले नसते तर शिवसेना फूटली नसती असे रामदास कदम यांनी सांगितले. ते म्हणाले, शिवसेना वाढवण्यामध्ये उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे त्यांचे कोणतेच कर्तुत्व नाही. यांना हे सर्व आयते मिळाले असल्याचे टीका कदम यांनी यावेळी केली. यावेळी व्यासपिठावर आमदार योगेश कदम, आमदार किरण सामंत, आमदार निलेश राणे , उद्योगमंत्री उदय सामंत, माजी आमदार राजन साळवी, माजी आमदार रामदास कदम, माजी आमदार सुभाष बने, रवींद्र फाटक, राजु महाडिक, बंड्या साळवी, माजी आमदार सदानंद चव्हाण यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत राजेंद्र महाडिक यांनी आपल्या पत्नीसह शिंदे गटात प्रवेश केला.

### काम करणारा कार्यकर्ता राजा

तसेच माजी जीप अध्यक्ष रोहन बने, पराग बने, ठाकरे गटाचे माजी जिल्हाध्यक्ष विलास चाळके, बाळा जाधव, अशोक सावंत यांच्यासह आठ विद्यमान सरपंच, उसरपंच, सदस्य यांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. शिवसेना ठाकरे गटातून हाकालपट्टी करण्यात आलेले जिल्हाप्रमुख विलास चाळके, रोहन बने, राजेंद्र महाडिक यांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला. लाडक्या बहिणींना आणण्यासाठी गावो गावी पाठविण्यात आल्याने प्रवाशांची व विद्यार्थीवर्गाची चांगली धावपळ झाली. शिवसेना ठाकरे गटातून लोक बाहेर पडत आहे, शिवसेना ठाकरे गटात कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्याचे काम केले गेले. मात्र बाळासाहेबांच्या या शिवसेनेत काम करणारा कार्यकर्ता राजा असणार आहे.

# माझ्याविरोधात कोणीतरी षडयंत्र रचतंय!

## आपण या षडयंत्राचा लवकरच पर्दाफाश करणार : आमदार सुरेश धस

। बीड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या प्रकरणात मनोज जरांगे पाटील, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, भाजपाचे आमदार सुरेश धस यांच्यासह अजून काही जणांनी या प्रकरणावरून चांगलाच आवाज उठवला. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे संबंध असल्याचा मुद्दा या नेत्यांकडून उपस्थित करण्यात आला. यावरून भाजपाचे नेते सुरेश धस यांनी अनेकदा टीका केली.**



मात्र, आता सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची माहिती समोर आली. यावरून आता चांगलंच राजकारण तापलं आहे. यावरून राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. यानंतर स्वत: सुरेश धस यांनी या भेटीबद्दल स्पष्टीकरण दिलं आहे. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याचे मान्य करत आपण त्यांच्या डोळ्याच्या शस्त्रक्रियेनंतर तब्येतीची विचारपूस करण्यासाठी भेटल्याचं स्पष्टीकरण दिलं. मात्र, यानंतर आज माध्यमांशी बोलताना सुरेश धस यांनी एक गंभीर आरोप केला आहे. "माझ्याविरोधात कोणीतरी षडयंत्र रचतंय", असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे. तसेच आपण या षडयंत्राचा लवकरच पर्दाफाश करणार असल्याचा इशाराही सुरेश धस यांनी दिला आहे.दोन गोष्टी काल एकत्र केल्या गेल्या. त्यामध्ये एक म्हणजे चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमच्या दोघांची लावलेली बैठक आणि मी धनंजय मुंडे यांच्या निवासस्थानी त्यांना भेटायला गेलो. या दोन्ही गोष्टी एकत्र झाल्या. चंद्रशेखर बावनकुळे यांची काल त्याबाबतमधील प्रतिक्रिया झाली. त्यानंतर धनंजय मुंडेंना मी भेटल्याचंही टिव्हीवर आलं किंवा ते लीक करण्यात आलं. याबाबत माझं असं मत आहे की याबाबत कोणीतरी व्यवस्थित माझ्याविरोधात षडयंत्र रचतंय. हे षडयंत्र कोण रचतंय हे देखील मला माहिती आहे. ही गोष्ट मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर घालणार आहे.

### माझ्या भूमिकेवर ठाम राहणार

तसेच हे जे कोण षडयंत्र रचतंय त्याचा पर्दाफाश मी योग्यवेळी करणार आहे", असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.धनंजय देशमुख आणि मस्साजोगकर यांचे मी मनापासून आभार मानतो. त्यांनी ठामपणे माझ्यावर विश्वास दाखवला. धनंजय मुंडेंनी संतोष देशमुखांच्या प्रकरणामध्ये माणुसकी सोडली. आमची अपेक्षा होती की धनंजय मुंडेंनी संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांची भेट घ्यायला हवी होती. पण धनंजय मुंडेही भेटायला आले नाहीत, पंकजा मुंडे देखील भेटायला आल्या नाहीत. पण आम्ही माणुसकी सोडलेली नाही, आम्ही माणुसकी म्हणून भेटायला गेलो. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणामध्ये मी काल, आज आणि उद्याही माझ्या भूमिकेवर ठाम राहणार आहे.

# महाकुंभमेळ्यात पुन्हा अग्नितांडव!

## महाकुंभमेळ्यात अनेक तंबू जळून खाक, भाविकांमध्ये भीतीचं वातावरण

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये गेल्या काही दिवसांपासून महाकुंभमेळा सुरु आहे. या कुंभमेळ्याला देशभरातून लाखो भाविकांनी सहभाग घेतला आहे. महाकुंभमेळ्यात आतापर्यंत लाखो भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. मात्र, कुंभमेळ्यात आग लागल्याच्या आतापर्यंत तीन घटना घडल्या आहेत. आजही पुन्हा एकदा भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. महाकुंभमेळ्यातील सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेत अनेक तंबू जळून खाक झाले आहेत.**



महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागली. या आगीत अनेक तंबू जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. आगीची घटना घडल्यानंतर लगेच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान, आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आगीचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र, ही आगीची घटना घडल्यामुळे भाविकांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली असंही सांगण्यात येत आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.बचाव आणि मदत कार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) च्या टीम देखील घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे. तसेच सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, अनेक भाविकांचे साहित्य जळून खाक झाले असल्याचं सांगितलं जात आहे. गेल्या आठवड्यातही महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ मध्येही अशीच आग लागली होती. शंकराचार्य मार्गावरील हरिहरानंद कॅम्पमधील २० हून अधिक तंबूंमध्ये आग पसरली होती. तेव्हाही अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं होतं.महाकुंभमेळ्याच्या जत्रा परिसरात १९ जानेवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आग लागल्याची एक घटना घडली होती. शास्त्री पुलाजवळ सेक्टर १९ येथील गीता प्रेसच्या कॅम्पमध्ये आग लागली होती. आगीत गीता प्रेसच्या १८० कॉटेज जळून खाक झाल्या होत्या. दरम्यान, त्या आधी महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येच्या दरम्यान चेंगराचेंगरी घटना घडली होती. त्या घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला होता तर ६० जण जखमी झाल्याचीही घटना घडली होती.महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागली. या आगीत अनेक तंबू जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. आगीची घटना घडल्यानंतर लगेच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान, आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आगीचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र, ही आगीची घटना घडल्यामुळे भाविकांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली असंही सांगण्यात येत आहे.ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे. तसेच सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, अनेक भाविकांचे साहित्य जळून खाक झाले असल्याचं सांगितलं जात आतेव्हाही अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं होतं. महाकुंभमेळ्याच्या जत्रा परिसरात १९ जानेवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आग लागल्याची एक घटना घडली होती.

### सेक्टर 18 आणि 19 मध्ये आग

आगीत गीता प्रेसच्या १८० कॉटेज जळून खाक झाल्या होत्या. दरम्यान, त्या आधी महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येच्या दरम्यान चेंगराचेंगरी घटना घडली होती. त्या घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला होता तर ६० जण जखमी झाल्याचीही घटना घडली होती.उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये गेल्या काही दिवसांपासून महाकुंभमेळा सुरु आहे. या कुंभमेळ्याला देशभरातून लाखो भाविकांनी सहभाग घेतला आहे. महाकुंभमेळ्यात आतापर्यंत लाखो भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. मात्र, कुंभमेळ्यात आग लागल्याच्या आतापर्यंत तीन घटना घडल्या आहेत. आजही पुन्हा एकदा भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. महाकुंभमेळ्यातील सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली.

---

# केजरीवालांना आणखी एक धक्का

## ‘आप’च्या 3 नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाला पराभवाला सामोरं जावं लागलं. दिल्लीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला बहुमत मिळालं, तर ‘आप’ला फक्त २२ जागांवर समाधान मानावं लागलं. आता दिल्लीत भाजपाचं सरकार स्थापन होणार आहे.**




दरम्यान, दिल्लीच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा तथा माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचाही पराभव झाल्यामुळे पक्षासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. असं असतानाच अरविंद केजरीवाल यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे.आम आदमी पक्षाच्या ३ नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. भाजपात प्रवेश केलेल्या नगरसेवकांमध्ये अनिता बसोया, नगरसेवक धर्मवीर, नगरसेवक निखिल चपराना यांचा समावेश आहे. भाजपाचे दिल्लीचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपात प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे भाजपा दिल्लीच्या महापौर पदासाठी पक्षाची ताकद वाढवण्याच्या हालचाली करत असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे दिल्ली महानगरपालिकेचे (एमसीडी) समीकरण बदलणार का? याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. दरम्यान, दिल्ली महापालिकेच्या महापौरपदासाठी एप्रिलमध्ये निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष आतापासून आपली संख्या वाढवण्यासाठी ताकद पणाला लावत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

### वीरेंद्र सचदेवा काय म्हणाले?

आता आम आदमी पक्षाच्या ३ नगरसेवकांनी भाजपात प्रवेश केल्यामुळे दिल्ली महापालिकेत भाजपाच्या नगरसेवकांच्या संख्याबळात वाढ झाली आहे. त्यामुळे आता एप्रिलमध्ये महापौरपदासाठी होणारी निवडणूक ही महत्वाची ठरण्याची शक्यता आहे.“दिल्लीला विकसित भारत अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेची राजधानी म्हणून विकसित करण्यासाठी केंद्र, दिल्ली स्वच्छ आणि सुंदर शहर बनवण्यासाठी आज तीन नगरसेवक भाजपात सामील झाले आहेत.

# प्रतीक बब्बरच्या लग्नानंतर पहिल्या बायकोची पोस्ट

बॉलीवूड अभिनेता प्रतीक बब्बर शुक्रवारी (१४ फेब्रुवारी) दुसऱ्यांदा लग्नबंधनात अडकला. त्याने गर्लफ्रेंड प्रिया बॅनर्जीशी व्हॅलेंटाइन डेला लग्न केलं. प्रतीकने मुंबईतील घरी प्रियाशी लग्नगाठ बांधली. दोघांच्याही लग्नाचे फोटो व व्हिडीओ सध्या चर्चेत आहेत. प्रतीकने लग्नात बब्बर कुटुंबाला बोलावलं नाही, त्यामुळेही बरीच चर्चा होत आहे. अशातच त्याच्या पहिल्या बायकोच्या पोस्टने लक्ष वेधून घेतले आहे. प्रतीक बब्बरचे पहिले लग्न सान्या सागरशी झाले होते. सान्या व प्रतीक यांनी २०१९ मध्ये लग्न केलं होतं, पण त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. ते चार वर्षांनी २०२३ मध्ये विभक्त झाले. त्यानंतर प्रतीकच्या आयुष्यात प्रिया आली. दोघेही प्रेमात





पडले आणि सोबत राहू लागले. दोन वर्षांपूर्वी व्हॅलेंटाइन डेला प्रेमाची कबुली देणाऱ्या प्रतीक व प्रिया यांनी प्रेमाचाच दिवस लग्नासाठी निवडला आणि साता जन्माचे सोबती झाले.प्रतीकच्या लग्नानंतर त्याची पहिली बायको सान्या सागरने केलेली पोस्ट चर्चेत आहे. सान्या सागरने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट केली आहे. ती पोस्ट एकटेपणाबद्दल आहे. "काही काळासाठी एकटं राहणं हे धोकादायक आहे. कारण त्याची सवय होते. त्यात किती शांतता आहे, हे तुम्हाला एकदा कळालं की मग तुम्हाला लोकांशी डील करावं वाटत नाही," असं सान्याच्या या पोस्टमध्ये लिहिलेलं आहे.

दरम्यान, प्रतीक बब्बर व सान्या लग्नाआधी ९ वर्षांपासून एकमेकांना ओळखत होते. २ वर्षे डेट केल्यानंतर त्यांनी लग्न केलं होतं. पण लग्नानंतर त्यांच्या वैवाहिक जीवनात खूप समस्या आल्या. दोघांनी नात्यातील अडचणी सोडवण्याचे खूप प्रयत्न केले, पण त्याचा काहीच फायदा झाला नाही. अखेर दोघांनी घटस्फोट घेतला.

## अमिताभ बच्चन आले अन् दुष्काळ संपला

अभिनयाचे बादशाह म्हणून अमिताभ बच्चन(AMITABH BACHCHAN) यांची ओळख आहे. त्यांनी साकारलेल्या अनेक भूमिका प्रचंड गाजल्या. जगभरात त्यांचे लाखो-करोडो चाहते आहेत. अनेक दिग्दर्शक, सहकलाकार, कनिष्ठ कलाकार त्यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव अनेकदा सांगतात. आता दिग्दर्शक अपूर्व लखिया यांनी अमिताभ बच्चन यांच्याबाबतची एक आठवण सांगितली आहे. दुष्काळ असलेल्या जैसलमेरमध्ये शूटिंग सुरू असताना अमिताभ बच्चन आले आणि अचानक त्याच वेळी पाऊस सुरू झाला, अशी आठवण त्यांनी सांगितली.दिग्दर्शक अपूर्व लखिया यांनी नुकतीच 'फ्रायडे टॉकिज'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत बोलताना त्यांनी म्हटले, "आम्ही जैसलमेरमध्ये मुंबई से आया मेरा दोस्त या चित्रपटाचे शूटिंग करीत होतो. त्यावेळी तिथे दुष्काळ पडला होता. या चित्रपटात अभिषेक बच्चन काम करीत होते. नवीन वर्षाच्या निमित्तानं अमिताभ बच्चन त्यांच्या कुटुंबासह तिथे भेटण्यासाठी आले होते. जया बच्चन, श्वेता, अमर सिंग त्यांच्याबरोबर होते.

## मला कथा माहीत नव्हती

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित आणि विकी कौशलची मुख्य भूमिका असलेला 'छावा' चित्रपट बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई करत आहे. पहिल्याच दिवशी या चित्रपटाने तिकीट बारीवर ३३.१ कोटींचा गल्ला जमवला. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर सर्वत्र यातील कलाकारांचं मोठं कौतुक होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून विकी कौशल आणि रश्मिका मंदाना या दोघांनी चित्रपटाच्या प्रमोशनसाठी कंबर कसली होती. चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त त्यांनी अनेक ठिकाणी मुलाखतीही दिल्या. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून या कलाकारांनी त्यांनी घेतलेली मेहनत आणि चित्रपटाशी जोडलेल्या अनेक गोष्टी चाहत्यांबरोबर शेअर केल्या. अशात आता अभिनेत्री रश्मिका मंदानाने नुकतीच एक पोस्ट इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केली आहे. यामध्ये तिने दिग्दर्शक लक्ष्मण उतेकरांचे आभार मानले आहेत. तसेच अभिनेता विकी कौशलच्या कामाचे कौतुक केले आहे.विकी तू खरा कलाकार आहेस, शत्रू वगैरे नंतर, पण मला आशा आहे की तुला जे हवं आहे ते तुला नक्की मिळेल. किंबहुना तुला त्याहून जास्त मिळेल. कारण तू त्यासाठी पात्र आहेस." चित्रपटाचे प्रमोशन सुरू असताना रश्मिका मंदानाच्या पायाला दुखापत झाली होती. त्यावेळी विकीने वेळोवेळी तिला साथ दिली. त्यावर पुढे लिहित तिने विकीचे आभार मानले आहेत. "माझा हात धरल्याबद्दल आणि प्रमोशनच्या संपूर्ण काळात मला दुखापत होऊ नये याची काळजी घेतल्याबद्दल तुझे खूप खूप धन्यवाद. जेव्हा जेव्हा मी शूटिंग करायचे, तेव्हा तू तिथे असायचा. शूटनंतर मी तुला विचारायचे की शॉट ठीक आहे का? आणि तुला जे खरं आहे वाटतं तेच सांगायचा, त्यासाठी धन्यवाद."रश्मिकाने तिच्या पोस्टमध्ये दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचेही आभार व्यक्त केले. तिने लिहिलं. "लक्ष्मण सर, मला तुम्ही खूप आवडता. मी तुम्हाला हे कधीच सांगितले नाही, पण तुम्ही खरोखरच आजपर्यंत मला भेटलेल्या सर्वात सुंदर व्यक्तींपैकी एक आाहात. तुम्हाला भेटता आल्याने आणि ओळखता आल्याने मी स्वत:ला भाग्यवान समजते."रश्मिकाने या पोस्टमध्ये लक्ष्मण उतेकर यांच्याबद्दल लिहिताना त्यांच्या पहिल्या भेटीचा किस्साही सांगितला आहे. तसेच चित्रपटासाठी मेहनत घेतलेल्या अन्य सर्व कलाकारांचे आणि संपूर्ण टीमचे आभार मानले आहेत. "संपूर्ण कलाकार आणि क्रू – मी खूप भाग्यवान आणि सन्मानित आहे.



## 9 वर्षांची ओळख अन् मराठी पद्धतीने लग्न

दिवंगत स्मिता पाटील व राज बब्बर यांचा मुलगा प्रतीक बब्बरने लग्न केलं आहे. त्याने व्हॅलेंटाईन डेला गर्लफ्रेंड प्रिया बॅनर्जीशी लग्नगाठ बांधली. प्रतीकचं हे दुसरं लग्न आहे, त्याचं पहिलं लग्न सहा वर्षांपूर्वी झालं होतं. तेव्हाही त्याने प्रेमविवाह केला होता, पण त्याचा घटस्फोट झाला. प्रतीकच्या पहिल्या पत्नीचे नाव सान्या सागर आहे. सान्या घटस्फोटानंतर मुंबई सोडून दुसरीकडे स्थायिक झाली आहे. सान्या सागर काय करते, ते जाणून घेऊयात.सान्या सागरचा जन्म १ मे १९९० रोजी लखनऊ, उत्तर प्रदेश येथे झाला होता. शिक्षण पूर्ण केल्यानंतर ती २००८ मध्ये मुंबईत आली. यानंतर तिने नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीमधून फॅशन कम्युनिकेशनमध्ये पदवी घेतली. सान्या पुढील शिक्षणासाठी लंडनला गेली. तिने लंडन फिल्म अकादमीमधून फिल्ममेकिंगमध्ये डिप्लोमा केला आणि नंतर गोल्डस्मिथ्स युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथून फिल्ममेकिंगमध्ये मास्टर्स पूर्ण केले.सान्या सागर ही बहुजन समाज पार्टीच्या प्रमुख मायावती यांचे निकटवर्तीय पवन सागर यांची मुलगी आहे. सान्याचे वडील राजकारणात आहेत.शिक्षण पूर्ण करून सान्या सागर भारतात परतली. तिने सुधीर मिश्रा फिल्म्समध्ये सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केलं. मग तिने लंडनमधील रॉकलिफ लिमिटेड आणि हेल्स किचन इंटरनॅशनल लिमिटेडमध्ये काम केलं. सान्याने 11TH HOUR नावाच्या प्रोजेक्टवरही काम केलं. सान्याने २०१७ मध्ये ZEE एंटरटेनमेंट एंटरप्राइझ लिमिटेडची डायरेक्टर म्हणून काम करण्यास सुरुवात केली. त्याच वर्षी सान्या सागरने स्वतःचे प्रोडक्शन हाऊस पिंकमॉस मीडिया प्रायव्हेट लिमिटेड स्थापन केले.

# सुंदर पिचाई यांना सुद्धा समन्स बजावले पाहिजेत

बीअर बायसेप्स या युट्यूब चॅनेलवर विविध विषयांवर आधारित पॉडकास्टच्या माध्यमातून रणवीर अलाहाबादिया लोकप्रिय ठरला. मात्र, इंडिया गॉट लेटेंटमध्ये त्याने केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणात ट्रोल केले जात आहे. इतकेच नाही तर त्याविरूद्ध विविध राज्यात पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहेत. अनेक नामांकित व्यक्तींनी त्याच्याकडून अशा वक्तव्याची अपेक्षा नसल्याचे म्हणत त्याच्यावर टीका केली आहे. आता या सगळ्यात प्रसिद्ध युट्यूबर गौरव तनेजाने रणवीरची बाजू घेतली आहे. सुरुवातीला त्याने रणवीरवर टीका करणारा व्हिडीओ शेअर केला होता. आता मात्र रणवीरला लक्ष्य केले जात आहे, असे म्हणत त्याने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर केला आहे.गौरव तनेजाने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये म्हटले, "जेव्हा सुरुवातीला हा वाद सुरू झाला होता. तेव्हा मी विचार केला देशातील काही युवा पीढी अजूनही संवेदनशील आहे. सगळेच मूर्ख नाहीत. मला असे वाटते की जेव्हा गोष्ट संस्कृतीची असते, परंपरेची असते तेव्हा लोक अशा गोष्टींविरूद्ध आपला आवाज उठवतात आणि ते अगदी योग्यही आहे. त्या शोमध्ये खूप गोष्टी चूकीच्या बोलल्या गेल्या आणि ते व्हायला नको होते. हे सगळे पाहिल्यानंतर मीसुद्धा त्यावर टीका केली होती. पण आता काय घडत आहे? आता त्या शोमधील या आधी येऊन गेलेल्या व्यक्तींनादेखील समन्स बजावले आहेत. विविध राज्यातील पोलिसांनी कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. रणवीरला सर्वोच्च न्यायालयात जावे लागले. जर प्रशासनाला आक्षेपार्ह भाषेची इतकीच काळजी असेल तर त्यांनी सुंदर पिचाईलासुद्धा समन्स बजावले पाहिजेत. सुंदर पिचाई हे गुगलचे सीईओ आहेत. जे युट्यूबचे मालक आहे.

# आपण क्रिकेटपटू आहोत अभिनेते नाही!

## आर अश्विनचे सुपरस्टार संस्कृतीवर मोठं वक्तव्य

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**माजी भारतीय फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विन यांनी भारतीय क्रिकेटमधील परिस्थिती सामान्य करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. संघातील सुपरस्टार संस्कृती संपवण्याच्या आवाहनादरम्यान त्यांची ही टिप्पणी आली आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभव झाल्यानंतर हे अधोरेखित झाले आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) खेळाडूंवर विविध निर्बंध लादले आहेत.**

आर अश्विनने आता त्याच्या यूट्यूब चॅनलवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये म्हणाला की, खेळाडू हे अभिनेते नसतात. भारतीय क्रिकेट संघात सुपरस्टारडमला प्रोत्साहन देऊ नये असेही ते म्हणाले. तामिळनाडूच्या या फिरकी गोलंदाजा म्हणाला की, क्रिकेटपटू असे असले पाहिजेत की ज्यांच्याशी सामान्य लोक जोडले जाऊ शकतील. पुढे जाण्यासाठी परिस्थिती सामान्य करण्याची तातडीने गरज आहे, यावरही त्याने भर दिला आहे. रविचंद्रन अश्विन म्हणाला, "भारतीय क्रिकेटमध्ये गोष्टी सामान्य करणे महत्वाचे आहे. आपण भारतीय क्रिकेट संघात सुपरस्टारडम आणि



सुपरस्टार संस्कृतीला प्रोत्साहन देऊ नये. आपण पुढे जाताना या सर्व गोष्टी सामान्य केल्या पाहिजेत. आपण क्रिकेटपटू आहोत. आपण अभिनेते किंवा सुपरस्टार नाही. आपण खेळाडू आहोत आणि आपण असे असले पाहिजे की ज्याच्याशी सामान्य लोक जोडले जाऊ शकतील आणि त्यांच्याशी स्वतःची तुलना करू शकतील. माजी फिरकीपटू पुढे म्हणाला, "उदाहरणार्थ, जर तुम्ही रोहित शर्मा किंवा विराट कोहली असाल, ज्यांनी खूप काही साध्य केले आहे.

### सुपरस्टारडमला प्रोत्साहन देऊ नये

जेव्हा तुम्ही अजून एक शतक झळकावता, तेव्हा ते फक्त तुमच्या यशाबद्दल नसते. ते नेहमीसारखेच असले पाहिजे आणि आपले ध्येय या यशांपेक्षा मोठे असले पाहिजेत." टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी ही सुपरस्टार संस्कृती संपवण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. बीसीसीआयने खेळाडूंना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की आता कोणताही खेळाडू संघापासून वेगळा प्रवास करणार नाही. सर्व संघ एकाच बसने प्रवास करतील.माजी भारतीय फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विन यांनी भारतीय क्रिकेटमधील परिस्थिती सामान्य करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) खेळाडूंवर विविध निर्बंध लादले आहेत. आर अश्विनने आता त्याच्या यूट्यूब चॅनलवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये म्हणाला की, खेळाडू हे अभिनेते नसतात. भारतीय क्रिकेट संघात सुपरस्टारडमला प्रोत्साहन देऊ नये असेही ते म्हणाले. तामिळनाडूच्या या फिरकी गोलंदाजा म्हणाला की, क्रिकेटपटू असे असले पाहिजेत.

# आयसीसीने चाहत्यांना दिलं मोठं गिफ्ट

## 9 भाषेत घेता येणार चॅम्पियन्स ट्रॉफीचा आनंद

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्व क्रिकेटप्रेमी आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या सुरुवातीची आतुरतेने वाट पाहत आहेत. मिनी वर्ल्ड कप म्हणून ओळखली जाणारी ही स्पर्धा यावेळी पाकिस्तानच्या यजमानपदाखाली खेळवली जात आहे. १९९६ नंतर पहिल्यांदाच पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी मिळाली आहे. दरम्यान, आयसीसीने बक्षीस रकमेची घोषणा करतानाच, या सामन्यांच्या थेट प्रक्षेपणाची सर्व माहिती शेअर करून भारतीय चाहत्यांना एक मोठी भेट दिली.**

या स्पर्धेत भारतीय संघ त्यांचे सामने दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये खेळेल. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा पहिला सामना १९ फेब्रुवारी रोजी खेळला जाईल, तर अंतिम सामना ९ मार्च रोजी होईल. यामध्ये सहभागी होणाऱ्या ८ संघांना प्रत्येकी ४ संघांच्या दोन वेगवेगळ्या गटात विभागण्यात आले आहे. आयसीसीने जाहीर केलेल्या लाईव्ह टेलीकास्टच्या माहितीत भारतीय चाहत्यांना मोठी भेट देण्यात आली आहे. पहिल्यांदाच, भारतीय चाहत्यांना ९ वेगवेगळ्या भाषांमध्ये आंतरराष्ट्रीय सामन्यांचे थेट प्रक्षेपण पाहता येईल.भारतात, सामन्यांचे थेट प्रक्षेपण स्पोर्ट्स १८ आणि स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर केले जाईल. याशिवाय, सामन्यांचे ऑनलाइन लाईव्ह स्ट्रीमिंग जिओ हॉटस्टार ॲपवर केले जाईल. ज्यामध्ये चाहते इंग्रजी, हिंदी, मराठी, हरियाणवी, बंगाली, भोजपुरी, तमिळ, तेलगू आणि कन्नड या ९ भाषांमध्ये समालोचनाचा आनंद घेऊ शकतील. याशिवाय, चाहत्यांना मल्टी-कॅम फीडचा आनंद घेता येईल. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी, आयसीसीने बक्षीस रकमेच्या बाबतीतही आपला खजिना उघडला आहे, जो गेल्या वेळेच्या तुलनेत ५३ टक्क्यांनी वाढला आहे. २०२५ ची आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या संघाला सुमारे २० कोटी रुपये मिळतील, तर उपविजेत्या संघालाही सुमारे १० कोटी रुपये मिळतील. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व संघांना किमान १ कोटी रुपये मिळतील.सर्व क्रिकेटप्रेमी आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या सुरुवातीची आतुरतेने वाट पाहत आहेत. मिनी वर्ल्ड कप म्हणून ओळखली जाणारी ही स्पर्धा यावेळी पाकिस्तानच्या यजमानपदाखाली खेळवली जात आहे.




### बक्षीस रकमेत 53 टक्क्यांनी वाढ

ज्यामध्ये चाहते इंग्रजी, हिंदी, मराठी, हरियाणवी, बंगाली, भोजपुरी, तमिळ, तेलगू आणि कन्नड या ९ भाषांमध्ये समालोचनाचा आनंद घेऊ शकतील. याशिवाय, चाहत्यांना मल्टी-कॅम फीडचा आनंद घेता येईल.२०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी, आयसीसीने बक्षीस रकमेच्या बाबतीतही आपला खजिना उघडला आहे, जो गेल्या वेळेच्या तुलनेत ५३ टक्क्यांनी वाढला आहे.

### अंतिम सामना 9 मार्च रोजी

मिनी वर्ल्ड कप म्हणून ओळखली जाणारी ही स्पर्धा यावेळी पाकिस्तानच्या यजमानपदाखाली खेळवली जात आहे. आयसीसीने बक्षीस रकमेची घोषणा करतानाच, या सामन्यांच्या थेट प्रक्षेपणाची सर्व माहिती शेअर करून भारतीय चाहत्यांना एक मोठी भेट दिली. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा पहिला सामना १९ फेब्रुवारी रोजी खेळला जाईल, तर अंतिम सामना ९ मार्च रोजी होईल.

# टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी रवाना!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ही स्पर्धा १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तानच्या यजमानपदाखाली सुरू होणार आहे, ज्यासाठी ८ पैकी ७ संघ पाकिस्तानला पोहोचत आहेत, तर भारतीय संघ १५ फेब्रुवारी रोजी दुबईला रवाना झाला आहे, जिथे तो या स्पर्धेत आपले सामने खेळेल. टीम इंडिया मुंबई विमानतळावरुन दुबईला रवाना झाल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये विराट-रोहित आणि कोच गौतम गंभीर दिसत आहे.

ज्यामध्ये रवाना होण्यापूर्वी २ बदल दिसून आले. या स्पर्धेत रोहित शर्मा भारतीय संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत आहे, ज्यांच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला होता. या महत्त्वाच्या स्पर्धेत टीम इंडियाला २० फेब्रुवारी रोजी बांगलादेश संघाविरुद्ध पहिला सामना खेळायचा आहे.

तेथील परिस्थिती लक्षात घेऊन, रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली दुबईला रवाना झालेल्या भारतीय संघात कुलदीप यादव, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांच्यासह ५ फिरकीपटूंचा समावेश करण्यात आला आहे.जेव्हा चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाचा संघ जाहीर झाला तेव्हा जसप्रीत बुमराहला त्यात स्थान मिळाले, परंतु तो पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे तो स्पर्धेतून बाहेर पडला आणि त्याच्या जागी हर्षित राणाला संघात स्थान देण्यात आले आहे. याशिवाय, यशस्वी जैस्वालच्या जागी वरुण चक्रवर्तीला संघात स्थान देण्यात आले.

या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी, भारतीय संघाने इंग्लंडविरुद्ध घरच्या मैदानावर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली, ज्यामध्ये त्यांनी तिन्ही सामने जिंकण्यात यश मिळवले आणि यामध्ये कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघेही आपला फॉर्म परत मिळवण्यात यशस्वी झाले.भारत आणि पाकिस्तानचे चाहते २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीची आतुरतेने वाट पाहत आहेत. या दिवशी टीम इंडिया दुबईच्या मैदानावर ग्रुप-ए मध्ये यजमान पाकिस्तानशी सामना करेल. टीम इंडियाचे सर्व सामने भारतीय वेळेनुसार दुपारी २:३० वाजता सुरु होतील.

## सेमिनार, पोस्टर, आर्टिकल, टेक रांगोळीतून “

# “रंगली आरडीएस2के25” स्पर्धा!

### शिक्षण विश्व: आकुर्डीतील प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील 426 विद्यार्थ्यांचा सहभाग





**। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**एम आय टी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे येथे आयोजित ‘क्षमता बळकटीकरण समारंभ, भारत’ या कार्यक्रमात महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ‘विधीमंडळात यशस्वी होण्यासाठी ऊत्तम संसदीय आयुधे’या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आमदार व लोकप्रतिनिधींना संसदीय कार्यपद्धती, प्रभावी कायदेविषयक प्रक्रिया आणि जनहिताच्या मुद्द्यांवरील प्रभावी सादरीकरण यासंदर्भात महत्वपूर्ण माहिती दिली.**

पिंपरी 15 फेब्रुवारी (प्रतिनिधी): सिकिंग, सेमिनार, पोस्टर, रील इट विन इट , आर्टिकल, टेक रांगोळी या विविध उपक्रमातून “आरडीएस2के25” स्पर्धा रंगली.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्रो. रामकृष्ण मोरे कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात “आरडीएस2के25” उत्साहात साजरा करण्यात आला.

रुल द एक्सिलेन्स या स्पर्धेचे आयोजन ७ आणि ८ फेब्रुवारी या दिवशी करण्यात आले. या अंतर्गत आरडीएस2के25 या स्पर्धेत सिकिंग, सेमिनार, पोस्टर,रील इट विन इट , आर्टिकल, टेक रांगोळी या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पहिल्या दिवशी एटीएसएस कॉलेजच्या डॉ. विनया केसकर, प्रा. अभय खंडागळे व उपप्राचार्य हिरालाल सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

या स्पर्धेसाठी पिंपरी चिंचवड मधील सर्व महाविद्यालयातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला एकूण ४२६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या प्रसंगी प्रा. रुपाली काळे,प्रो. श्रेया गोरे, डॉ. रामदास पवार , डॉ. सविता वेणेगुरकर, प्रो.विष्णु गाडे,डॉ. मधुकर पालवे व इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. या स्पर्धेसाठी डॉ. पद्मावती इंगोले, डॉ. रामदास लाड,प्रो. गंगाधर किटाळे,प्रो. विक्रांत शेळके, प्रो. विवेक कोल्हे यांनी परीक्षकाचे कामकाज पाहिले.

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी प्रयत्न...**

डॉ. विनया केसकर यांनी अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत व्यक्तिमत्वाला आकार मिळतो. यासाठी मार्गदर्शन केले डॉ. अभय खंडागळे यांनी संगणक क्षेत्रातील विविध विषयांवर मुलांना मार्गदर्शन केले. संगणक शास्त्र विभागाच्या प्रमुख प्रो. रुपाली काळे यांनी मुलांच्या कालगूंणाना वाव मिळावा म्हणून मार्गदर्शन केले. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा .वर्षा टेमगिरे यांनी काम पाहिले. त्यांना संगणक शास्त्रातील इतर सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले.

---

## ‘पीसीसीओई’च्या टीम क्रॅटोस रेसिंगचा फॉर्म्युला भारत-2025 मध्ये विक्रम!

### भारतीय विद्यार्थी मोटरस्पोर्टच्या क्षेत्रात नवा आदर्श घालून देत, अभियांत्रिकी कौशल्याने स्पर्धेवर वर्चस्व

**। पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पीसीसीओईच्या टीम क्रॅटोस रेसिंगने फॉर्म्युला भारत २०२५ मध्ये इतिहास रचत सर्व गतीशील (डायनॅमिक) स्पर्धांमध्ये अव्वल स्थान पटकावत अपराजेय कामगिरी केली आहे! भारतीय विद्यार्थी मोटरस्पोर्टच्या क्षेत्रात नवा आदर्श घालून देत, संघाने आपल्या अभियांत्रिकी कौशल्याने स्पर्धेवर वर्चस्व मिळवले आहे.**




फॉर्म्युला भारत ही भारतातील सर्वात प्रतिष्ठित आणि आव्हानात्मक विद्यार्थी वाहनस्पर्धा आहे. यामध्ये संघटित नियोजन, अभियांत्रिकी कौशल्य आणि सातत्यपूर्ण मेहनतीचे अचूक प्रदर्शन पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांनी घडवले. अभूतपूर्व नवसंशोधन, उत्कृष्ट तांत्रिक क्षमता आणि अपराजित जिद्द यांच्या जोरावर संघाने अतुलनीय कामगिरी केली, ज्यामुळे कष्ट, नियोजन आणि अचूकतेतूनच यश प्राप्त करता येते हे सिद्ध झाले आहे.

सर्व गतीशील स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावणे हे मोठे यश आहे! हे संघाच्या तांत्रिक पारंगततेचे, काटेकोर नियोजनाचे आणि सातत्यपूर्ण परिश्रमांचे फलित आहे. वाहनाच्या नवनिर्मितीपासून चाचणी व कार्यक्षमतेच्या सुधारणा करण्याच्या प्रत्येक टप्प्यावर केलेल्या अथक प्रयत्नांचा हा परिपाक आहे. संघाने संघभावना, नवनिर्मिती आणि सखोल अभियांत्रिकी ज्ञानाच्या जोरावर ही अपूर्व कामगिरी केली आहे, ज्यास प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे पाठबळ लाभले आहे. विद्यार्थी वाहनस्पर्धांमध्ये नवीन उच्चांक प्रस्थापित करताना हा अभूतपूर्व विजय केवळ टीम क्रॅटोस रेसिंगपुरता मर्यादित नसून संपूर्ण फॉर्म्युला भारत समुदाय व भारतीय तरुण अभियंत्यांसाठी प्रेरणादायी आहे. संघाच्या विक्रम मोडणाऱ्या कामगिरीमुळे भविष्यातील स्पर्धांसाठी नवे आव्हान उभे राहिले आहे, आणि संशोधन, चिकाटी व संघभावना या मूल्यांच्या आधारे मोठी शिखरे गाठता येतात हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करताना संघातील सर्व सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! ही तर सुरुवात आहे; आम्हाला विश्वास आहे की टीम क्रॅटोस रेसिंग भविष्यातही उच्चतम यशाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत राहील!

टीम क्रॅटोस रेसिंग ही ४३ अभियंत्यांपासून बनलेली एक प्रतिष्ठित, ना-नफा तत्त्वावर कार्य करणारी विद्यार्थी संस्था आहे, जी भारतीय विद्यार्थी वाहनस्पर्धांमध्ये आघाडीवर आहे. संघाने आतापर्यंत फॉर्म्युला भारत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा ४ वेळा जिंकली आहे. २०२३ मध्ये, संघाने फॉर्म्युला स्टुडंट ईस्ट आणि फॉर्म्युला स्टुडंट जर्मनी या जगातील अत्यंत प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये यशस्वी सहभाग घेतला. विशेष म्हणजे, संघाने जागतिक स्तरावर ७वा क्रमांक पटकावत अव्वल १० मध्ये स्थान मिळवले आणि हे स्थान मिळवणारा एकमेव भारतीय विद्यार्थी संघ ठरला! संघाची नवीन तांत्रिक कल्पनांवर निष्ठा, उत्कृष्ट अभियांत्रिकी कौशल्य आणि अपराजित जिद्द ही त्यांची खरी ओळख आहे. संघ जगभरात भारतीय अभियांत्रिकीचे सामर्थ्य सिद्ध करत नवनवे उच्चांक प्रस्थापित करत आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+ NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+ CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+ 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+ TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+ 13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# 'LPJ इनोव्हेशन अवॉर्ड-२०२५' स्पर्धेच्या नावनोंदणीसाठी मुदतवाढ

## आमदार शंकर जगताप : विद्यार्थ्यांना 7 लाखांची बक्षिसे जिंकण्याची संधी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप कला आणि क्रीडा अकादमीतर्फे 'LPJ इनोव्हेशन अवॉर्ड-२०२५' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या सृजनशील आणि नावीन्यपूर्ण कल्पनांना वाव देण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. मागील वर्षी पिंपरी.चिंचवड शहरातील 5000 विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यंदा या स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्यासाठी 12 मार्चपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे, अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.




ही स्पर्धा इयत्ता ७ वी ते ९ वी, इयत्ता १० वी ते १२ वी आणि पदवी (UG) व पदव्युत्तर (PG) अशा तीन गटांमध्ये घेतली जाणार आहे. यात वैयक्तिक व सांघिक अशा स्वरूपात विद्यार्थ्यांना एकूण ७ लाख रुपयांची बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांसोबतच शिक्षक आणि पालकांनाही त्यांच्या स्वप्नातील शाश्वत शहर कसे असावे यासंदर्भात कल्पना मांडण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेतून शहरातील रहदारी, पायाभूत सुविधा, आपत्ती व जल व्यवस्थापन, स्मार्ट सिटी संकल्पना, ई-गव्हर्नन्स, डिजिटलायझेशन, पर्यावरण, महसूल, आरोग्य, संस्कृती आणि वारसा यासारख्या विषयांवर नावीन्यपूर्ण उपाय सुचविणाऱ्या ३२ सर्वोत्तम कल्पनांना प्रोत्साहन व निधी दिला जाणार आहे.

### अधिक माहितीसाठी संपर्क:

मोबाईल क्रमांक – 7058927700 / 9307262906 पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या नवसंकल्पना सादर करून शहर आणि देशाच्या शाश्वत विकासात योगदान द्यावे, असे आयोजकांकडून आवाहन करण्यात आले आहे.

### स्पर्धेत सहभागी कसे व्हावे?

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प, पीपीटी, व्हिडीओ किंवा संकल्पना WWW.LPJFOUNDATION.COM या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अपलोड कराव्यात.

### शेवटची तारीख वाढवली!

स्पर्धेत भाग घेण्यासाठी नावनोंदणी व प्रकल्प सादर करण्याची अंतिम तारीख १२ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.